**दि. २५  सप्टेंबर २०२४**

**कृषि विज्ञान केंद्र,धुळे, आत्मा धुळे आणि लूपिन फाउंडेशन, धुळे यांच्या वतीने कृषि विज्ञान केंद्र धुळे या ठिकाणी शेतकऱ्यांन करिता एक दिवसीय कार्यशाळा संपन्न....**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ **कृषि विज्ञान केंद्र,धुळे, आत्मा धुळे आणि लूपिन फाउंडेशन, धुळे यांच्या वतीने कृषि विज्ञान केंद्र धुळे या ठिकाणी शेतकऱ्यांन करिता एक दिवसीय कार्यशाळा भाजीपाला लागवड तंत्रज्ञान या विषयावर संपन्न.** सदर कार्यशाळा डॉ. बबनराव ईल्हे, अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला पंकज पाटील, या प्रशिक्षण कार्यक्रमास  प्रमुख उद्धाटक श्री. चंद्रकांत पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प, धुळे हे होते.  प्रमुख उपस्थितांमद्धे डॉ. राहुल देसले, प्राचार्य, घटक कृषि तंत्र विद्यालय, धुळे, श्री. नवनाथ कोळपकर, प्रकल्प संचालक, आत्मा धुळे, डॉ.दिनेश नांद्रे, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, श्री. नीलेश पवार, समन्वयक व्यवस्थापक महाराष्ट्र उपजीविका कार्यक्रम लूपिन लूपिन फाउंडेशन, धुळे, श्री. सुनील सैदाने, लूपिन फाउंडेशन, धुळे, डॉ. आतिश पाटील, डॉ. धनराज चौधरी, श्री. गौरव पाटील  आदी मान्यवर तसेच धुळे जिल्हयातील शेतकरी मोठ्या संखेने कार्यक्रमास उपस्थित होते

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी **भाजीपाला  लागवड तंत्रज्ञान** प्रशिक्षणाचा उद्देश सांगत केले. सदर कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. राहुल देसले  यांनी भाजीपाला लागवड करत असताना त्यामध्ये सेंद्रिय खताचे महत्व सांगत उपस्थित शेतकारीं यांना मार्गदर्शन केले. **प्रमुख उद्धाटन मार्गदर्शनामद्धे** श्री. चंद्रकांत पवार यांनी जास्तीत जास्त शेतकरी, महिला, युवकानी अश्या प्रकारच्या कार्यशाळेत सहभाग घेत शस्वत शेती उत्पादनाकडे मार्गक्रमण करावे, त्यासोबतच पाण्याचे काटेकोर पणे नियोजन करत उत्पादन घेतले पाहिजे आणि प्रगत शेती करण्याचे आव्हान उपस्थित शेतकरी बांधव, महिला, युवक यांना केले.

**अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. बबनराव इल्हे** यांनी भाजीपाला लागवडीचे महत्व अधोरेखित केले तसेच भाजीपाला **लागवडी मध्ये** महात्मा फुले कृषि विद्यपीठ, राहुरी मध्ये होत असलेल्या संशोधना विषयी माहिती देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच  भाजीपाला पिकामधील एकात्मिक कीड व एकात्मिक रोग या विषयी उपस्थिताना मार्गदर्शन केले.

तांत्रिक चर्चासत्रा मध्ये डॉ. अतिश पाटील यांनी भाजीपाला पिकामधील अन्नद्रव्य व्यवस्थापन, डॉ. दिनेश नांद्रे यांनी कांदा लागवड तंत्रज्ञान तर डॉ. धनराज चौधरी यांनी शेती पीक पद्धतीमध्ये पशुधनाचे महत्व या विषयावर

मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.धनराज चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन अतिश पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी विज्ञान केंद्र धुळे येथील सर्व शात्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी, तसेच **लूपिन फाउंडेशन, धुळे** येथील सर्व अधिकारी, कर्मचारी  यांचे अनमोल सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमास धुळे जिल्ह्यातील ३०० शेतकरी बंधू भगिनी उपस्थित होते.